जिल्हा परिषदांचे विधि लेखा परिक्षण करण्याकरिता मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : विधि -२०१९/प्र.क्र.२९/विधि कक्ष

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दि. २० ऑगस्ट, २०१९

प्रस्तावना :-

ग्राम विकास विभागामध्ये अंदाजे ७००० न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहेत. केंद्र शासनाच्या निर्देशनानुसार महाराष्ट्र राज्य वाद विवाद धोरण विधि व न्याय विभागाने २७.०८.२०१४ च्या शासन निर्णयानुसार लागू करण्यात आले. राष्ट्रीय विवाद धोरणामध्ये राज्य शासन हा एक कार्यक्षम व जबाबदार पक्षकार असावा असे अपेक्षित आहे. ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदांकरिता न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याबाबत योग्य प्रकरण व वेळ व्यवस्थापन यामार्फत अनावश्यक विवादावर निर्बंध घालणे याकरिता जिल्हा परिषदामध्ये प्रायोगिक तत्वावर वर्धा जिल्हा परिषदेची कायदेशीर विधि परिक्षण करण्याकरिता प्रायोगिक तत्वावर निवड केलेली आहे. या कायदेशीर विधि परिक्षणाचा मूळ हेतू हा न्यायालयातील शासकीय विवाद कमी करणे हा आहे. याकरिता विविध यंत्रणांचा अवलंब करुन न्यायालयामध्ये प्रलंबित असणाऱ्या प्रकरणाचे प्रमाण कमी करणे जेणेकरुन न्यायालयाचा बहुमूल्य वेळ गुणवत्तापूर्ण प्रकरणे सोडविण्यात देता येईल. याकरिता ऑल इंडिया रिपोर्टर प्रा. लि., नागपूर यांची कायदेशीर विधि परिक्षण करण्याकरिता निवड करण्याचे प्रस्तावित आहे.

शासन परिपत्रक :-

साध्य करावयाची उद्दीष्टये :-

१.१) विविध न्यायालयामधील प्रकरणाची प्रलंबितता कमी करणे

१.२)सर्व न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू सकारात्मक पध्दतीने मांडणे व निरर्थक प्रकरणे विनाकारण जतन करुन ठेवली जाणार नाहीत याची सुनिश्चिती करणे.

१.३)सर्व प्रलंबित न्यायालयीन प्रकरणाचे पुर्नविलोकन करणे आणि विविध न्यायालयापुढे प्रलंबित असलेली मुदतबाहय, निरुपयोगी आणि परिणामशून्य प्रकरणे निकालात काढण्यासाठी सर्व प्रकरणे राज्यस्तरीय अधिकार प्रदत्त समितीकडे सादर करणे.

१.४)शासनाच्या शासननिर्णयाचा चूकीचा अर्थ तसेच तांत्रिक युक्तीवाद करणे टाळणे.

१.५)पर्यायी वाद विवाद निवारण यंत्रणेमार्फत प्रकरणे निकालात काढण्यासाठी प्रोत्साहन देणे तसेच विधायक दृष्टीकोन स्वीकारणे.

१.६)जिल्हा परिषदेने न्यायालयीन विवादाच्या संदर्भातील माहिती न्यायालयाने सामाईक त्रुटी, दोष, विसंगती, चूका दर्शवून देणारे निर्देश, परिच्छेदनिहाय अभिप्राय, उत्तरादाखलचे प्रतिज्ञापत्र, अपीलासाठीचे प्रस्ताव सादर/दाखल करण्यात होणारा विलंब, कसूर आदेशाच्या अंमलबजावणीतील निष्क्रीयता/हलगर्जीपणा किंवा आदेशाची अंमलबजावणी न करण्यामागची प्रात्यक्षिक कारणे, आवश्यक ते सर्व कागदपत्र पुरविण्यास आलेले अपयश, प्रकरणाचा मागोवा घेण्यात अधिकाऱ्यास आलेले अपयश इत्यादींची कारण मिमांसा करुन शिफारस करेल.

१.७)प्रलंबित न्यायालयीन प्रकरणाची, त्यांचे निकाल, प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे ही दहा वर्षे, पाच वर्षे आणि तीन वर्षापेक्षा जास्त जून्या असणाऱ्या प्रकरणाचा अभ्यास करुन शासनास सदर प्रकरणे लवकर निकाली काढण्यासाठी शिफारस देईल.

१.८)न्यायालयीन मुदतबाहय, निष्फळ किंवा असफल न्यायालयीन प्रकरणाची, उच्च न्यायालयाच्या किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या कोणत्याही निवाडयाअंतर्गत (आव्हान न दिलेल्या) व (सामावून घेतलेल्या) प्रकरणाची सूची देईल.

२.२) कायदेशीर ऑडिटमधील समिती :-

२.२.१)विधि लेखा परिक्षण समितीची रचना

कायदेशीर विधि लेखा परिक्षण करणाऱ्या समितीचे अध्यक्ष व सदस्य न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश, कायदातज्ञ व अभियोक्ता इत्यादी असतील.

२.२.२) समितीची कार्यकक्षा :-

जिल्हा परिषदेने न्यायालयीन विवादाच्या संदर्भातील माहिती न्यायालयाने सामाईक त्रुटी, दोष, विसंगती, चूका दर्शवून देणारे निर्देश, परिच्छेदनिहाय अभिप्राय, उत्तरादाखलचे प्रतिज्ञापत्र, अपीलासाठीचे प्रस्ताव सादर/दाखल करण्यात होणारा विलंब, कसूर आदेशाच्या अंमलबजावणीतील निष्क्रियता/ हलगर्जीपणा किंवा आदेशाची अंमलबजावणी न करण्यामागची कारणे, आवश्यक ते सर्व कागदपत्र पुरविण्यास आलेले अपयश, प्रकरणाचा मागोवा घेण्यात अधिकाऱ्यास आलेले अपयश इत्यादीची शिफारस करेल. जिल्हा परिषदेला किंवा शासनाला आर्थिक नुकसान झाले आहे याबाबतच्या प्रकरणाची कारणमिमांसा व योग्य शिफारस करेल.

राज्य सरकारला झालेल्या नुकसानीची माहिती, दस्तऐवज, शेऱ्यासह तसेच सरकारी वकील, जिल्हा परिषदेचे वकील यांचे मूल्यमापन (Accountability) बदद्ल प्रणालीची शिफारस

राज्यस्तरीय अधिकार प्रदत्त समितीकडे ग्रामविकास विभागाच्या स्तरावरील स्थापित प्रदत्त समितीमार्फत पाठवितील.

यासर्व न्यायालयीन प्रकरणात प्रस्तावित उपाययोजना किंवा योग्य कार्यवाही करण्यासाठी तसेच न्यायालयीन प्रकरणाचा लवकरात लवकर निर्णय लावण्यासाठी किंवा ती निकाली काढण्यासाठी राज्य विवाद धोरणाच्या अंतर्गत राज्य स्तरावरील अधिकार प्रदत्त समितीकडे सादर करण्याची शिफारस करेल.

३.३) जिल्हा परिषदेतील कार्यकारी समिती :-

३.३.१) कार्यकारी समितीची रचना :-

जिल्हा परिषदेतील समितीचे अध्यक्ष जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असतील आणि इतर सभासदांमध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत तसेच इतर अधिकारी हे राहतील. जिल्हा परिषदेतील नोंदणी शाखेमधील प्राप्त झालेल्या सर्व न्यायालयीन प्रकरणांची व त्यावरील केलेल्या कार्यवाहीची सर्व माहिती संकलित करण्याची जबाबदारी नोडल अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन यांची राहील. याबाबतचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी स्वतंत्ररित्या निर्गमित करुन, तात्काळ समिती गठीत करावी.

३.३.२) कार्यकारी समितीची कार्यकक्षा :-

अ)ही समिती जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा परिषदेने आव्हानित वाद, विषय, गट, क्षेत्र, कर्मचाऱ्याचा प्रवर्ग, विवादाचा प्रकार, विवादाचा कालावधी, विभाग, मागासवर्ग, महिला, धोरणे, तत्समविषयक विवाद याव्दारे न्यायालयीन विवादाची माहितीची वर्गवारी करुन टेंम्पलेट ऑनलाईन प्रकरणेमध्ये संकलित करुन दयावी.

ब)जिल्हा परिषदेने न्यायालयीन विवादाच्या संदर्भातील माहिती न्यायालयाने सामाईक त्रुटी, दोष, विसंगती, चूका दर्शवून देणारे निर्देश, परिच्छेदनिहाय अभिप्राय, उत्तरादाखलचे प्रतिज्ञापत्र, अपीलासाठीचे प्रस्ताव सादर/दाखल करण्यात होणारा विलंब, कसूर आदेशाच्या अंमलबजावणीतील निष्क्रीयता/ हलगर्जीपणा किंवा आदेशाची अंमलबजावणी न करण्यामागची कारणे, योग्य व पूर्ण सूचना देण्याबाबत केलेली चूक, आवश्यक ते सर्व कागदपत्र पुरविण्यास आलेले अपयश, प्रकरणाचा मागोवा घेण्यात अधिकाऱ्यास आलेले अपयश इत्यादीची माहिती कार्यकारी समिती देईल. जिल्हा परिषदेला किंवा शासनाला आर्थिक नुकसान झाले आहे याबाबतची माहिती देईल.

क) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणाची, त्यांचे निकाल, प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे ही दहा वर्षे, पाच वर्षे आणि तीन वर्षापेक्षा जास्त जून्या असणाऱ्या न्यायालयीन प्रकरणाची कार्यकारी समिती देईल.

विधि लेखा परिक्षण समिती उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन त्याचा अहवाल दोन महिन्यांत विभागप्रमुखांना सादर करावा. अहवाल सादर झाल्यानंतर विधि लेखा परिक्षण समितीवरील सदस्यांना एकत्रितरित्या मानधनाबाबत स्वतंत्ररित्या आदेश विभागातर्फे निर्गमित करण्यात येईल. विधि लेखा परिक्षण समितीवरील अध्यक्ष, सदस्य यांच्या नियुक्ती व मानधनाबाबत ऑल इंडिया रिपोर्टर प्रा. लि., नागपूर यांनी उचित कार्यवाही करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१९०८२०१४५८५४३९२० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Surendrakumar Gupta

Digitally signed by Aseem Surendrakumar Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Developement Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Surendrakumar Gupta
Date: 2019.08.20 15:55:51 +05'30'

(असीम गुप्ता)

प्रधान सचिव (ग्रामविकास विभाग)